तुम्ही यरुशलेम सोडून गेलात तेव्हाची माझी कृत्ये विसरुन
जा. **20**"मी पापी आहे हे तुम्ही जाणता. म्हणूनच योसेफच्या
घराण्यातून तुमच्या भेटीला आलेली मी पहिलीच व्यक्ती
आहे."
**21**पण सरुवेचा मुलगा अबीशय म्हणाला, "परमेश्वराने
निवडलेल्या राजाविषयी शिमीने शिव्याशाप दिले. तेव्हा
त्याला ठारच करायला हवे."
**22**दावीद म्हणाला, "सरुवेच्या मुलानो. मी तुमच्या बरोबर
कसे वागावे? तुमचे हे बोलणे आज माझ्या विरूद्ध आहे.
इस्राएलमध्ये कोणालाही ठार केले जाणार नाही कारण
आज मी इस्राएलचा राजा आहे."
**23**मग राजा शिमीला म्हणाला, "तू मरणार नाहीस."
आपण शिमीचा वध करणार नाही असे राजाने शिमीला
वचन दिले.*

### मफीबोशेथ दावीदाला भेटायला येतो

**24**शौलचा नातू मफीबोशेथ राजा दावीदाला भेटायला
आला. राजा यरुशलेम सोडून गेला तेव्हा पासून तो सुखरुप
परतेपर्यंत मफीबोशेथने स्वत:कडे फार दुर्लक्ष केले होते.
त्याने दाढी केली नाही, पायांची निगा राखली नाही की
कपडे धुतले नाहीत. **25**मफीबोशेथ यरुशलेमहून आला
तेव्हा राजा त्याला म्हणाला, "मी तेथून निघालो तेव्हा तूही
माझ्याबरोबर का बाहेर पडला नाहीस?"
**26**मफीबोशेथने सांगितले, "महाराज, माझ्या नोकराने,
सीबाने, मला फसवले, त्याला मी म्हणालो, 'मी पांगळा
आहे तेव्हा गाढवावर खोगीर चढव म्हणजे त्यावर बसून
मी राजाबरोबर जाईन' **27**पण त्याने माझ्याशी लबाडी केली.
माझ्याविरुद्ध तुझे कान फुंकले पण स्वामी, तुम्ही
देवदूतासारखे आहात. आपल्याला योग्य वाटेल ते करा.
**28**माझ्या आजोबांच्या घराण्याचा तुम्ही समूळ नाश करू
शकला असता पण तसे तुम्ही केले नाही. तुम्ही मला
आणखी काही जणाबरोबर आपल्या पंक्तीला बसवलेत.
तेव्हा मला काहीही तक्रार करायचा हक्क नाही."
**29**तेव्हा राजा मफीबोशेथला म्हणाला, "आता आपल्या
अडचणीविषयी आणखी काही सांगू नकोस. आता माझा
निर्णय ऐक. तू आणि सीबा जमीन विभागून घ्या."
**30**मफीबोशेथ राजाला म्हणाला, "महाराज ती सगळी
जमीन खुशाल घेऊ सीबाला द्या माझे धनी सुखरुप परत
आला यात सगळे आले."

### दावीद बर्जिल्ल्यला बोलवून घेतो

**31**गिलादचा बर्जिल्ल्य रोगलीमहून आला. दावीदाला तो
यार्देन नदीच्या पलीकडे पोचवायला आला. **32**बर्जिल्ल्यचे
वय झाले होते. तो ऐंशी वर्षांचा होता. राजा दावीदाचा
मुक्काम महनाईम येथे असताना त्याने दावीदाला अन्नधान्य
आणि इतर गोष्टी पुरवल्या होत्या. श्रीमंत असल्यामुळे तो
एवढे करु शकला. **33**दावीद त्याला म्हणाला, "नदी उतरुन
माझ्याबरोबर चल. तू यरुशलेममध्ये माझ्याबरोबर
राहिलास तर मी तुझा सांभाळ करीन."
**34**पण बर्जिल्ल्य राजाला म्हणाला, "तुला माझे वय माहीत
आहे का? यरुशलेमपर्यंत मी तुझ्याबरोबर येऊ शकेन
असे तुला वाटते का? **35**"मी ऐंशी वर्षांचा आहे. वार्धाक्यामुळे
मी आता बऱ्यावाईटाची पारख करु शकत नाही. खातोपितो
त्याची चव सांगू शकत नाही. गाणाऱ्या स्त्री पुरुषांच्या
आवाजाला दाद देऊ शकत नाही. राजा, माझ्या राजा
तुझ्यामागे माझे लोढणे कशाला लावून देऊ? **36**आता
मला तुझ्याकडून अनुग्रहाची अपेक्षा नाही. मी तुझा सेवक.
यार्देन नदी मी उतरुन तुझ्याबरोबर येतो. राजाने अशाप्रकारे
या बक्षिसाने परतफेड का करावी?" **37**पण मला पुन्हा
परत घरी जाऊ दे. म्हणजे माझ्या गावात मी देह ठेवीन
आणि माझ्या आईवडीलांच्या कबरीतच माझे दफन होईल.
पण किम्हनला आपला चाकर म्हणून बरोबर घेऊन
जाऊ शकतोस. महाराज आपल्या मर्जीप्रमाणे त्याला वागव.
**38**तेव्हा राजा म्हणाला, "तर किम्हाम माझ्याबरोबर
येईल. तुला स्मरुन मी त्याचे भले करीन. तुझ्यासाठी मी
काहीही करायला तयार आहे."

### दावीद घरी परततो

**39**राजाने बर्जिल्ल्यचे चुंबन घेऊन त्याला आशीर्वाद
दिले. बर्जिल्ल्य आपल्या घरी परतला. राजा इतर
लोकांबरोबर नदी ओलांडून पलीकडे गेला.
**40**नदी ओलांडून राजा गिलगाल येथे आला. किम्हाम
त्याच्याबरोबर होता. यहूदाचे सर्व लोक आणि निम्मे इस्राएल
लोक राजाला नदी ओलांडून पोचवायला आले.

### इस्राएलांचा यहूद्यांशी वाद

**41**सर्व इस्राएल लोक राजाकडे आले. ते म्हणाले, "आमचे
बांधव यहूदी यांनी तुमचा ताबा घेऊन तुम्हाला आणि
तुमच्या कुटुंबियांना यार्देन पार करुन आणले असे का?"
**42**तेव्हा सर्व यहूदी लोकांनी त्या इस्राएल लोकांना
सांगितले, "कारण राजा आमचा जवळचा आप्त आहे.
तुम्हाला एवढा राग का यावा? आम्ही राजाच्या अन्नाचे
मिंधे नाही. त्याने आम्हाला बक्षीसांची लालूचही दाखवली
नाही."
**43**इस्राएल लोक म्हणाले, "आमच्याकडे दावीदाचे दहा
हिस्से* आहेत. तेव्हा तुमच्यापेक्षा आमचा त्याच्यावर जास्त

---

**मग राजा शिमीला ... वचन दिले** दावीदाने शिमीला मारले नाही, पण पुढे काही वर्षांनी दावीदचा मुलगा शलमोन याने शिमीचा वध करण्याची आज्ञा दिली. पाहा 1 राजे 2:44-46.

**दहा हिस्से** राज्य विभागणीनंतर यहूदा आणि बन्यामीन मिळून यहूदांचे राज्य झाले उरलेले दहा घराणी इस्राएलांच्या राज्यात होती.

